Exh.22

नेवासा येथील मे.सिव्हील जज्ज साहेब,ज्यु.डी

यांचे कोर्टात

रे.मु.नं.

७९०/२०२३

**वादी**

सविता विजय चौधरी, वगैरे

**प्रतिवादी**

शिवाजी चांगदेव बऱ्हाटे, वगैरे

**याकामी प्र.वादी तर्फे वादीचे दावा दुरुस्तीचे अर्जावर म्हणणे असे ते खालीलप्रमाणे :-**

१) सदरचा अर्ज मुळत: खोटा, बेकायदेशिर कपोलकल्पीत कथनावर आधारलेला आहे. वादी म्हणतात तशी कधीही परिस्थिती नव्हती व नाही, असण्याचे कारणही नाही. अशा प्रकारचा अर्ज वादीला कायद्याने करता येणार नाही. म्हणून सदरचा अर्ज रद्द होण्यास पात्र आहे.

२) सदरचा दुरुस्ती अर्ज हा कायदेशिर नाही. सदरच्या दुरुस्तीमुळे दाव्याचे मुळ स्वरुपात बदल होणार आहे. वादी अनेक अर्ज देऊन दाव्याचे काम लांबवीत आहेत. सदरच्या दुरुस्तीमुळे दाव्याची गुंतागुंत वाढणार आहे. केवळ अशा प्रकारचे अर्ज देवून वादी दाव्याचे कामकाज लांबवीत आहे. सबब वादीचा दावा दुरुस्तीचा अर्ज बेकायदेशिर असल्याने रद्द करण्यात यावा.

३) सदरची दुरूस्ती वादी हिला कायदयाने करता येणार नाही. कारण सदरचा रे.मु.नं.१२३/२०२४ मध्ये प्रतिवादी व त्यांचे मुलांमध्ये तडजोड

Order
---------------------------
Read & recorded

SANDHYA YUVRAJ SUL
Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL
Date: 2025.11.11 18:17:54 +0530

2nd Jt.CJJD Newasa

होवून प्रतिवादी यांना हिस्सा देण्यात आलेला आहे. त्यामुळे त्यांची नावे गावचे रेकॉर्ड ऑफ राईटला ७/१२ उताऱ्याला लागलेली आहे.

४) वादीचा सदरचे मिळकतीशी कुठलाही कायदयाने संबंध कधीही नव्हता व नाही. वादी ही एकत्र कुटुंबाची सदस्य कधीही नव्हती व नाही. त्यामुळे मुळतः वादीस सदरचे दावा मिळकतीबाबत हिंदु वारसा कायदयाप्रमाणे कुठलाही हक्क अधिकार संबंध नव्हता व नाही.

५) रे.मु.नं.१२३/२०२४ प्रमाणे कायदेशीररित्या वाटप होवून गावचे रेकॉर्ड ऑफ राईटला नोंदीही झालेल्या आहेत. त्यास वादीने कोठेही हरकत घेतलेली नाही. केवळ या प्र.वादीस त्रास देण्यासाठी वादी खोटे अर्ज देत आहे.

६) वरील सर्व कारणांचा व परिस्थितीचा विचार करण्यात येवून वादीचा अर्ज खर्चासह रद्द करण्यात यावा.

येणेप्रमाणे प्र.वादी तर्फे वादीचे दुरुस्ती अर्जावर म्हणणे असे.

नेवासा

दिनांक :११/११/२०२५

प्र.वादी तर्फे ॲडव्होकेट